नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २५३ Issue - 253 | वार गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ Blow- Thursday Date 30 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाकुंभ मेळ्यातील चेंगराचेंगरीत ३० भाविकांचा मृत्यू, ९० जण जखमी

## दुर्घटनेच्या १६ तासांनी अधिकाऱ्यांनी मृतांचा आकडा केला जाहीर, २५ मृतदेहांची ओळख पटली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळा असून बुधवारी मौनी अमावस्यानिमित्त शाही स्नान होतं. मात्र यावेळी मोठी गर्दी झाली आणि चेंगराचेंगरीची भीषण घटना घडली. सुरुवातीला या चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती होती. मात्र आता महाकुंभ मेळ्याचे अधिकारी आणि कुंभ डीआयजी अर्थात उपमहानिरीक्षक वैभव कृष्ण यांनी चेंगराचेंगरीबाबत सविस्तर माहिती दिली आहे. दुर्घटनेच्या १६ तासांनी अधिकाऱ्यांनी मृतांचा अधिकृत आकडा सांगितला आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाकुंभ मेळ्यातील चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी अपघातात ३० भाविकांचा मृत्यू झाला आहे. तर आतापर्यंत ९० भाविक जखमी झाले आहेत. जखमींना शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. काही जखमींना मेडिकल कॉलेजमध्येही दाखल करण्यात आलं आहे.

चेंगराचेंदरीत मृत्यू झालेल्या ३० जणांपैकी २५ मृतदेहांची आतापर्यंत ओळख पटली आहे. पाच मृतदेहांची ओळख अद्याप पटलेली नाही. त्यासाठी अधिकाऱ्यांनी महाकुंभ मेळ्यातील मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी हेल्प-लाइन नंबर जारी केला आहे. आपल्या जवळच्यांबद्दलच्या माहितीसाठी, बेपत्ता झालेल्यांसाठी १९२० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क करण्याचं सांगण्यात



आलं आहे.

कुंभ उपमहानिरीक्षकांनी चेंगराचेंदरी नेमकी कशी झाली याचं कारणही सांगितलं आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मौनी अमावस्येच्या ब्रह्म मुहूर्ताच्या वेळी लोकांची प्रचंड गर्दी झाली होती. कुंभमेळा परिसरात प्रचंड गर्दीमुळे आखाडा रस्त्यावरील अनेक बॅरिकेड्स तुटले. दुसऱ्या बाजूला लोक आंघोळीसाठी बसले होते, त्यांना जमावाने, अचानक आलेल्या गद-र्दीने चिरडायला सुरुवात केली. यानंतर पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू केलं. रुग्णवाहिकेच्या मदतीने जवळपास ९० जखमींना रुग्णालयात नेण्यात आलं. दुर्दैवाने त्यातील ३० भाविकांचा मृत्यू झाला. काही जखमींना घरी पाठवण्यात आलं आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांन महाकुंभच्या या दुर्घटनेनंतर न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. तीन सदस्यीय समिती या घटनेची चौकशी करणार आहे. चेंगराचेंगरची घटना बॅरिकेट्स तुटल्यामुळे घडल्याचं त्यांनी म्हटलं आहे. भाविकांच्या मोठ्या गर्दीमुळे हे बॅरिकेट्स तुटून हा अपघात झाल्याची माहिती त्यांनी दिली. चेंगराचेंगरीत मृत्यू झालेल्या भाविकांच्या कुटुंबीयांना २५ लाख रुपये भरपाई जाहीर करण्यात आली आहे.

## आरोग्य विभागातील डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरा : आरोग्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरु करण्याचे आदेश राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. आरोग्य विभागात यापू-र्वी झालेल्या परीक्षेतील प्रतीक्षा यादीत असलेल्या एमबीबीएस उमेदवारांना तातडीने नियुक्ती देवून, मार्च महिन्याअगोदर डॉक्टरांची नवीन भरती प्रकिया करण्याचे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी दिले आहेत.

रायगड जिल्ह्यातील आरोग्य विषयक बाबींचा आढावा रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थित घेण्यात आला. या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव वीरेंद्र सिंह, आयुक्त अम गोथू श्री रंगा नायक, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर व आरोग्य विभागातील वरिष्ट अधिकारी उपस्थित होते. रुग्णालयात गैरहजर राहणाऱ्या बंधपात्रित डॉक्टरांवर दंडात्मक कारवाई सुरु करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या असून, सर्व रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध राहावेत, अशी सक्त ताकीद संबंधित डॉक्टरांना देण्यात आली आहे. आरोग्य विभागातून सेवानिवृत्त झालेल्या वैद्यकीय अधिकारी व विशेषतज्ञ यांना परत सेवेत घेण्यात येणार असून, त्यासाठी वेळप्रसंगी नियमात बदल करण्याच्या सूचनाही आरोग्य मंत्र्यांनी दिल्या आहेत. रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी रायगड जिल्ह्यातील वाढते औद्योगीकीकरण व मुंबई-गोवा महामार्गवरील अपघात यामुळे ट्रॉमा केअर सेंटर वाढवण्याची, दोन डायलेसिस सेंटर वाढवण्याची तसेच डॉक्टरांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याची मागणी केली. या सर्व मागण्या तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. रायगड जिल्हा-तील आरोग्य आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाही यावेळी आरोग्यमंत्र्यांनी दिली.

## थोडक्यात...

### सौदी अरेबियात भीषण अपघात; ९ भारतीय नागरिकांचा मृत्यू

नवी दिल्ली : सौदी अरेबियाच्या जीजान येथे एका रस्ते अपघातात नऊ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. जेद्दा येथील भारतीय दूतावासातील मुत्सद्दी अधिकाऱ्यांनी अपघात झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. भारतीय दूतावासाने सांगितले की, अपघातात मरण पावलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना सदर माहिती दिली जात आहे, तसेच त्यांना सर्वतोपरी मदत दिली जाणार आहे. भारतीय दुतावासाने एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, सौदी अरेबियाच्या पश्चिम क्षेत्रातील जीजान येथे झालेल्या रस्ते अपघातात नऊ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भारताचे वाणिज्य दूतावास या प्रकरणी पूर्ण सहकार्य करत आहे. जखमींच्या प्रकृतीमध्ये लवकरात लवकर सुध-ारणा व्हावी, अशी अपेक्षा. पुढील चौकशीसाठी हेल्पलाईनची स्थापना करण्यात आली आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीही या प्रकरणाची दखल घेतली असून एक्सवर पोस्ट करत दुःख व्यक्त केले आहे. सौदी अरेबियातील अपघात आणि जीवितहानीबद्दल ऐकून दुःख झाले. जेद्दामधील भारताच्या दूतावासाशी बोललो. तेथील अधिकारी संबंधित कुटुंबियांच्या संपर्कात आहेत.

## 'जीबीएस'मुळे आणखी एक मृत्यू, पुण्यातील ससून रुग्णालयात नोंद; राज्यातील रुग्णसंख्या १२७ वर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या १२७ वर पोहोचली असून, आणखी एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. ससून सर्वोपचार रुग्णालयात ५६ वर्षीय महिलेचा जीबीएसने मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ सुरू झाल्यापासून राज्यातील हा दुसरा रुग्ण मृत्यू ठरला आहे. मंगला उमाजी चव्हाण (वय ५६) असे जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या म हिलेचे नाव आहे. त्या सिंहगड रस्त्यावरील नांदोशी येथील रहिवासी होत्या. त्यांना १५ जानेवारीला अशक्तपणा आणि अर्धांगवायूची लक्षणे जाणवू लागली. त्यांना नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचा प्रकृती बिघडल्याने त्यांना १७ जानेव-ारीला ससून रुग्णालयात हलविण्यात आले. ससूनमध्ये उपचार सुरू असताना त्यांचा २८ जानेवारीला मृत्यू झाला. श्वसनक्रिया थांबण्यासह अर्धांगवायूमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे.

राज्यात जीबीएसची रुग्णसंख्या आता १२७ झाली असून, त्यातील २० जण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यातील रुग्णांमध्ये २३ रुग्ण हे पुणे महापालिका क्षेत्रातील असून, ७३ रुग्ण हे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील आहेत. याचबरोबर पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील १३, पुणे ग्रामीणमधील ९ आणि इतर जिल्ह्यांतील ९ रुग्ण आहेत. राज्यातील एकूण रुग्णांपैकी ७२ रुग्णांचे जीबीएसचे निदान झालेले आहे, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे १२१ रुग्णांचे शौच नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यातील २१ नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस हा विषाणूसंसर्ग आणि ५ नमुन्यांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणूसंसर्ग आढळला आहे. याचबरोबर २५ रुग्णांचे सेरेब्रोस्पायनल फ्लुईडचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यात एका नमुन्याम ध्ये इपस्टीन बार विषाणूसंसर्ग आढळला आहे. तसेच, २०० रुग्णांच्या रक्त नमुन्यांमध्ये झिका, डेंग्यू आणि चिकुनगुन्या संसर्ग आढळून आलेला नाही, असे आरोग्य विभागाने नमूद केले आहे. राज्यात गुइनेल बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. याची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. महाराष्ट्रातील आरोग्याची ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे.

## गोविंद पानसरे हत्येप्रकरण; ६ आरोपींना जामीन मंजूर; कुटुंबीय सर्वोच्च न्यायालयात जाणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येला १० वर्ष पूर्ण होणार आ-हेत. मात्र अद्याप देखील या प्रकरणातील आरोपींविरोधात सबळ पुरावे हाती लागलेले नाहीत. कॉ.गोविंद पानसरे यांना न्याय मिळणार का? हा प्रश्न कायम असतानाच आता या प्रकरणातील आरोपींबाबत मोठी बातमी समोर आली आहे. कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील ६ आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. न्यायमूर्ती ए.एस.किल्लोर यांच्या एकलपीठाकडून हा निर्णय देण्यात आला आहे.

कोल्हापूर येथे १६ फ ेब्रुवारी २०१५ रोजी कॉ. गोविंद पानसरे आणि त्यांची पत्नी सकाळी वॉकिंग साठी गेले असता, दोन हल्लेखोरांनी दुचाकीवरुन येऊन अचानक गोविंद पानसरे यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या. या हल्ल्यात पानसरे यांचा चार दिवसांनी मृत्यू झाला. या प्रकरणाच्या सुरुवा-तीला कोल्हापूर येथील राजारामपुरी पोलिसांनी तपास केला. पण नंतर या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे विभागाच्या अतिरिक्त पोलीस म हासंचालकांच्या देखरेखेखालील विशेष तपास पथकाकडे वर्ग करण्यात आला. मात्र गेल्या दहा वर्षांत हल्लेखोरांवर पुराव्या अभावी शिक्षा होऊ शकलेली नाही. या गुन्ह्यातील सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित देगवेकर, भरत कुरणे, वासुदेव सूर्यवंशी, अमित बद्दी या आरोपींना २०१८ ते २०१९ या दरम्यान पोलिसांनी केली होती. आरोपी आतापर्यंत तुरुंगात होते. मात्र हा खटला लवकर निकाली लागण्याची शक्यता नसल्याने आरोपींना आज जाम ीन मंजूर करण्यात आल्याचे उच्च न्यायालयाकडून सांगण्यात आले आहे. या तपासामध्ये प्रगती नसल्यामुळे आरोपी जामिनासाठी पात्र असल्याचा निर्वाळा ही न्यायालयाकडून देण्यात आला.

दरम्यान आरोपींचे वकील ॲड.वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी या खटल्याबाबत बोल-ताना सुरुवातीपासूनच हा खटल्यामध्ये षडयंत्र असल्याचा उल्लेख वारंवार झाला, मात्र या खटल्यातील सहा आरोपींचा जामीन मंजूर करताना उच्च न्यायालयाने षडयंत्र रचल्याची थेरी मोडीत काढली आहे. या खटल्यातील आणखी एक आरोपी वीरेंद्र तावडे यालाही जामीन मिळेल असा आशावाद ॲड. वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी व्यक्त केला.

### पानसरे कुटुंबीय सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावणार

**दरम्यान या निर्णयानंतर कॉ.मेघा पानसरे यांनी कोल्हापुरात म ाध्यमांशी संवाद साधताना म्हणाल्या, मुंबई उच्च न्यायालयाने पानसरे खटल्याची सुनावणी डे टू डे घेण्याची सूचना केली होती. मात्र आता या खटल्यातील सहा आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात जामीन अर्ज फेटाळावा यासाठी वरिष्ठ वकिलांशी चर्चा करून आपण सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावणार असल्याचं म्हटलं आहे. तर या खटल्याचे विशेष सरकारी वकील एडवोकेट शिवाजीराव राणे यांनी उच्च न्यायालयाने दिलेला निकालाची प्रत हातात आल्यानंतर वरिष्ठांशी बोलून याबाबतचा निर्णय घेऊ, मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ वकिलांशी आणि पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करून या खटल्यातील कच्चे दुवे काय आहेत याबाबत चर्चा करून निर्णय घेऊ. आरोपींच्या वकिलांनी या खटल्यामध्ये आरोपीं-चा कालावधी तुरुंगात जास्त दिवस गेल्याचं कारण दिलं आहे. मात्र याबाबत मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश हातात आल्यानंतरच निर्णय घेता येईल, असं ॲड. शिवाजीराव राणेंनी म्हटले आहे.**

## महिलांना रोजगार देण्यासाठी पिंक रिक्षा योजनेअंतर्गत ५ हजार महिलांना लवकरच रिक्षा वाटप करणार

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे

# १८ जिल्ह्यांसह राज्यभर अहिल्या भवन उभारण्याच्या कार्यवाहीस गती द्यावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई दि. २९ : महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या सबलीकरणासाठी अहिल्या भवनाच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे काम सुरू होणार आहे. १८ जिल्ह्यात अहिल्या भवनचे कार्य सुरू असून, राज्यातील उर्वरित जिल्ह्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी अहिल्या भवन उभारण्यासाठीच्या प्रक्रियेस गती देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

मंत्रालय येथील दालनात महिला व बालकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी विभागामार्फत सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी विभागाचे सचिव अन-ुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. लवकरच ४ जिल्ह्यातील अहिल्या भवनचे लोकार्पण करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्याच्या सूचनाही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी यावेळी दिल्या.

महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, प्रत्येक जिल्ह्यात उभारण्यात येणारे हे अहिल्या भवन महिला, बालक व दिव्यांगांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी सज्ज असणार आहे. तसेच अहिल्या भवन उभारण्यासंदर्भातील पायाभूत सुविधा उभारण्याचे निर्देशही तटकरे यांनी यावेळी दिले.

महिला व मुलींना रोजगार मि



ळावा, त्यांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण व्हावे, आणि महिला वर्गाचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'पिंक ई-रिक्षा' च्या योजनेसंदर्भात संबंधितांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्राप्त अर्जापैकी पाच हजार पात्र महिलांना लवकरच या योजनेअंतर्गत रिक्षाचे वितरण करण्यात येणार आहे.

याचबरोबर रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फिरते पथक कार्यरत असून, आजतागायत तीन हजारपेक्षा जास्त मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम विभागाने या पथकाच्या म ाध्यमातून केले आहे. प्रायोगिक तत्वावर सुरू असलेल्या हा उपक्रम व्यापक स्वरूपात सुरू करण्यासाठीची कार्यवाही करण्यासंदर्भातही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सूचना दिल्या. नोकरी करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी पाळणाघर आवश्यक असल्याने गरजु महिलांच्या मुलांसाठी अंगणवाडी केंद्रासोबत पाळणाघर सुरू करण्यात येणार आहे. पाळणाघर सेविका व मदतनिस यांचे मानधन तसेच निर्भया समुपद-ेशन केंद्रावरील समन्वयकाचे मानधन वाढविण्यासंदर्भातही सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचेही तटकरे यांनी यावेळी उपस्थित सम न्वयक महिलांना सांगितले. तसेच, माध्यमिक शिक्षणाकडे वळणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण विभागाशी समन्वय साधुन उपाययोजना आखण्यासंदर्भातही निर्दे श तटकरे यांनी यावेळी दिले.

### लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांकडून रक्कम परत जमा करण्याबाबत शासनाकडून सक्ती नाही

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमधील लाभार्थी महिलांकडून त्यांना दिलेला लाभ शासनाकडून सक्तीने परत घेण्यात येत नाही. असे स्पष्टीकरण महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी केले आहे. काही लाभार्थी महिला योजनेच्या अटी शर्तीनुस-ार अपात्र ठरत असल्याने स्वेच्छेने लाभाची रक्कम परत करत आहेत. तसेच ज्या महिलांकडून पुढील कालावधीतील लाभ नको असल्याबाबत स्वेच्छेने कळविण्यात येत आहे अशा महिलांची विनंती विचारात घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.**

## संपादकीय....

### रुग्णसंख्येत वाढ चिंताजनक

राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या १२७ वर पोहोचली असून, आणखी एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. ससून सर्वोपचार रुग्णालयात ५६ वर्षीय महिलेचा जीबीएसने मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ सुरू झाल्यापासून राज्यातील हा दुसरा रुग्ण मृत्यू ठरला आहे. मंगला उमाजी चव्हाण (वय ५६) असे जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या सिंहगड रस्त्यावरील नांदोशी येथील रहिवासी होत्या. त्यांना १५ जानेवारीला अशक्तपणा आणि अर्धांगवायूची लक्षणे जाणवू लागली. त्यांना नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचा प्रकृती बिघडल्याने त्यांना १७ जानेवारीला ससून रुग्णालयात हलविण्यात आले. ससूनमध्ये उपचार सुरू असताना त्यांचा २८ जानेवारीला मृत्यू झाला. श्वसनक्रिया थांबण्यासह अर्धांगवायूमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. राज्यात जीबीएसची रुग्णसंख्या आता १२७ झाली असून, त्यातील २० जण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यातील रुग्णांमध्ये २३ रुग्ण हे पुणे महापालिका क्षेत्रातील असून, ७३ रुग्ण हे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील आहेत. याचबरोबर पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील १३, पुणे ग्रामीणमधील ९ आणि इतर जिल्ह्यांतील ९ रुग्ण आहेत. राज्यातील एकूण रुग्णांपैकी ७२ रुग्णांचे जीबीएसचे निदान झालेले आहे,

## सांगोला पोलिसांची मोठी कारवाई; २५ तोळे सोन्याचे चोरी करणाऱ्या आरोपींना पकडण्यात यश

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

आंध्र प्रदेशातील धर्म राम फास्ट टाऊन पोलीस ठाण्याकडील चोरीच्या गुन्ह्या-



तील संस्थेत आरोपीच्या मुस्क्या आवळून त्यांच्याकडून तब्बल २५ तोळे सोने (२४५.६५ ग्रॅम वजनाच्या) सोन्याच्या लगड हस्तगत करून या आरोपीला आंध्रप्रदेश राज्यातील पोलिसांकडे पुढील तपासाकामी ताब्यात देण्यात सांगोला पोलिसांना यश मिळाल्याने सांगोला पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

याबाबत सविस्तर हकीकत अशी की आंध्र प्रदेश राज्यातील धर्मवरम फास्ट टाऊन पोलीस ठाण्याकडील पोलीस हवालदार नागाजनेलु हे पोलीस पथकाचे सांगोला पोलीस ठाणे येथे येऊन धर्मराव पोलीस ठाणे गु.र.न.१७/२०२५बी.एन.एस.२०२३ चे कलम ३१८(४),३१६,(४) प्रमाणे दाखल होण्याची पाहिजे व संशोध आरोपी याचा शोध घेणे कामी सांगोला पोलीस ठाण्याची वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांचे समक्ष हजर झाले त्यांनी लेखी पत्र लिहून पोलीस मदत मिळणा-कमी विनंती केली.

त्यानुसार पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस ठाण्याकडे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन जगताप, पोलीस हवालदार वांजळे,पोलीस हवालदार क्षीरसागर पोलीस कॉन्स्टेबल पांढरी यांच्या तपास पथक तयार करून मदत कामी आंध्र प्रदेश पोलिसांसोबत रवाना करण्यात आले सांगोला पोलीस ठाण्याकडील तपास पथकाकडून संशयित आरोपी इसमाचा तांत्रिक पद्धतीने तसेच कसोशीने शोध घेत असतात त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत संशयित हिसम हा सांगोला एसटी स्टँड व आजूबाजूच्या परिसरात दिसून आल्याची माहिती मिळाली.

सदर माहिती मिळतात हे तपास पथक वरील ठिकाणी जाऊन त्या शोधून अटकले असता तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागल्याने त्याला पोलीस इसका दाखवत ताब्यात घेऊन दोन पंचासह अंगद रफी घेतले असता त्याच्याकडे एकूण२४५.६५ ग्रॅम मोजण्याच्या सोन्याचा लगड मिळून आला सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन जगताप यांनी आरोग्य कडून सदर मुद्देमाल तपासाकामी तात्काळ जप्त करून संशयित इसम मिळून आलेली सोने हे आंध्र प्रदेश राज्यातील पोलिसाकडे पुढील तपासाकामी ताब्यात दिली.

सदर कामगिरी बजानारी पोलीस अधिकारी व कर्मचारी सोलापूर जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, मंगळा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळेस.पो.नि. सचिन जगताप पोलीस हवालदार वांजळे पोलीस हवालदार क्षीरसागर पोलीस कॉन्स्टेबल पांढरे यांनी सदरचे उत्कृष्ट उत्तम कामगिरी पार पाडली.

# सर्वत्रची मुले : (सातारची) मुले

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सातारची मुल कशी आहेत ? ती खेळणारी आहेत.ती ग्रंथालयात जाणारीआहेत. तीसार्वजनिक बाग बगीच्यात बागडणारी मुले आहेत. कोणत्या वयोगटातील ही मुले आपण सातारचे मुले म्हणून ठरवत आहोत.? हे मुलांचे वयोगट वेगवेगळे असतात हा केजी टू पीजी पण यामध्ये शिशुगट एक ते पाच पर्यंतच्या वयोगटातील मुलांचा समावेश ही बागडणारी मुले म्हणून गट ठरवितात येतो का? प्रत्येक घरातील हे चैतन्य असेच फुलत राहते असते. ते ते घर अस्तित्व चैतन्याने भरलेले असते. या शिष्य गटातील मुलांच्या सर्व गटातील मुलांचा वावर हा मानवी संस्कृतीतील आनंदाचा चिंतनाचा आणि विकासाचा ध्यास असतो. तो असायला हवा आहे . आपली मुले ही चिंतेची आणि काळजीची जास्त गोष्ट आहे. आपल्या मुलांचे भवितव्य ही आपल्या आयुष्यभरची काळजी वाटते आहे, पण आपली मुले ही बालपणातील घडणारी हेतूपूर्वक प्रयोग करीत वाढवावयाची संस्काराची स्वतःची जबाबदारीची कृती असते. आपली मुले प्रेमाची आणि मायेची ही तर अनुभती सार्वत्रिकच असते.सातारची मुले आणि आपली मुले ही वेगळी असत नाहीत.

आपली मुले ही सामूहिक समाजाच्या जबाबदारीची आणि कल्पक उपक्रमांच्या आधारे हे बाल जगत विकसित करण्याची एक शैक्षणिक संस्कृती असते. ती असायला हवी. मूल हे भविष्याचे विकसित होणारे स्वप्न कसे विकसित होते ,याचे भाकित मुळातच कुणाला वर्तवता येत नाही, पण ती दिशा ठरवता येते ,पण मुलांना ठरवून वाढवणे. हा मुलांच्या वरील एक मायेचा बळजबरीचा पालक भितीचा तो प्रयत्न असतो. आपल्या मुलांचे भविष्य आपले कुटुंबाचे समाजाचे भविष्य असायला हवे. खरे तर पालकांच्या महत्त्वकांक्षा आणि मुलांचे भविष्य हे क्वचितच जुळणारी गोष्ट असते, ठरवून बालविकास घडवणे ही तशी अवघड गोष्ट आहे. मुलांना मायेचे पर्यावरण देणारे पालक हे आदर्शच आहेत, पण परिस्थिती प्रतिकूलता दारिद्र्य निरक्षरता विषमता आणि अक्षय उदासीनता हीसुद्धा बालविश्वाला ग्रासलेली संकटे आहेत. बालविश्व ही समाजाच्या वर्तमानाची समृद्ध विकसित होत जाणारे वाटचाल असते समाजाची वर्तमान हे बालकांचे भविष्य असते. बालकांच्या भविष्याच्या अदृश्य धूसर वाटा या सर्वांच्याच समोर असतात पण यावर चालण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. सातारची मुले ही निसर्गप्रेमी चित्र प्रेमी पक्षी प्रेमी खेळणी प्रेमी अशी कितपत आपणाला घडवता येतात. मुलांचे आणि निसर्गाचे नाते मुलांची आणि पशुपक्षी प्राणी यांचे नाते आज शहरी संस्कृतीत खूप व्यापकपणे विकसित होताना सानिध्यपूर्ण आढळत नाही. या सर्व मनोविकासाच्या अवस्था बालकांना प्राप्त होणे. आवश्यक आहे मूल पाहते मुल बोलते मुल ऐकते. मुल अनेक प्रकारची आमीसे जे पाहत असते. सर्व सतत त्याला अस्थिर करत असतात .त्याचे मन खेचत असतात. खेळणी हा सगळा बालमोहनाचा असं तिचा विषय आकाराची खेळणी रंगाची खेळणी आवाजाची खेळणी पाळणारी खेळणी किती खेळण्यांचे प्रकार आणि किती वैविध्य आणि बालमन गुंतणारा हा भवताल खूप खेळणाऱ्या मुलांच्यासाठी आता आधुनिक आणि समृद्ध होतो आहे. खेळणारी मुले सुदृढ मुले पाडणारी मुले सहन शील मुले अशी असतात. अशा मुलांचे भाव विश्व सर्वच पालक कमी जास्त स्वरूपात समजावून घेत असतात. बालकाचे मनोविश्व बुद्धी विकास आणि स्वभावतालचे पर्यावरण हा एक अभ्यासाचा शिक्षण क्षेत्रातील प्रयोगशील बाल विकासाचा प्रत्येक घरातून सुरू होणारा प्रयत्न असायला हवा काही पालकांच्या बाबतीत हे प्रयत्न आढळून येतात. शाळांच्या मध्ये सुद्धा ही प्रयत्न प्रायोगिक व उपक्रम म्हणूनही घेतले जातात मात्र याचे सातत्य राहत नाही सातारची मुले भाषा शिकतात बोलने शिकतात.

सातारची मुले संमिश्र संस्कृतीतून समाजाच्या संमिश्रवस्त्यातून फ्लॅट बंगले ते गल्ली या सगळ्या वातावरणातून वावरत असतात .वाढत असतात.. या मुलांचे भावविश्व ही एक मोठी समजावून घेण्याची बाल जगतातील

पालक साक्षरतेची नितांत गरज आहे. जवळपास पावणे दोन लाख लोकसंख्या असलेल्या शहर व परिसरात नित्य बागेत खेळणारी मुले आढळत नाहीत . पुस्तकांच्या सानिध्यात ग्रंथालयाच्या कपाटा जवळ रेंगाळणारी मुले खूप आढळून येत नाही. पालकांच्या बरोबर सतत क्लास साठी येजा करणारी मुले दिसून येतात. फुललेल्या बाजारपेठेत सणा उत्सवाला खरेदीसाठी रस्त्या वर दिसणारी मुले खूप भेटतात. हीच ती हसणारी असायला हवीत. ती मुले सतत वाढायला हवित. सर्वच शाळांच्या समोर शाळा भरण्यापूर्वी शाळा मध्यंतरात खाऊ साठी गर्दी करणारी मुले मैदानावर दंगा करणारी मुले दिसून येतात. ही खरी तर चैतन्याची खूण असते. पण या सगळ्या गोगटात यांच्यामधीलमुलांचे प्रयोगशाळेतील

प्रयोग करणे दिसत नाही ते सातत्याने वाढत नाही. असे प्रयत्न होत नाहीत महाविद्यालयीन प्रात्यक्षिके जर्नल्स तेवढी एक आशेची बाब पण सर्वत्र मुले पुस्तकाच्या पर्यावरणात चित्रांच्या सतत निर्माण कार्यातदंग दिसत नाहीत. ग्यादरिंग उत्तर व पूर्व शालेय काळात सतत मैदानावर सराव का करत राहत नाहीत?

सातारच्या मुलांना मार्क्स मिळवणे श्रेणी मिळवणे. चांगल्या क्लासला जाणे क्लासचे होमवर्क सतत करत राहणे क्लास ही आपली मुक्ती ती आपल्या शैक्षणिक भविष्याची वाटचाल वाटून राहते. हे पालकांनी सातारच्या मुलाचे घडवलेले मानस कित्येक वर्ष इथे बदलताना दिसत नाही प्रयोगशील उपक्रमात सतत सहभाग घेणारी मुले साताऱ्यात आढळत नाहीत. सतत उपक्रमशीलता याचे संयोजनच शिक्षण क्षेत्रात व्यापक प्रमाणात सर्व शाळा महाविद्यालयांच्या मध्ये आढळून येत नाही. हा रोप नाही, पण ही वास्तवता आहे म्हणून सातार ची मुले बाजारातील मुले दिसून येतात आई-वडिलांच्या ताना बरोबर शाळांच्या चक्रात नियमाने फिरत राहणारी मुले ही शिक्षण जगतातील मोठी बाब आहे, पण क्लास गुरुकुल पुन्हा शाळा हीच त्यांचे उद्याचे आशावादी घडणे बनवून गेले आहे .पालकांना याच्या पलीकडे स्वप्ने पडत नाहीत. मुले अक्षरांच्या दुनियेत रमत नाही चित्रांच्या रंगीबेरंगी निर्माण कार्याचा सर्व शाळांच्या मधून सतत व्यस्त ठेवणे महत्त्वाचेही वाटत नाही. कल्पना विस्व आणि सातारची मुले यांचे नाते अद्याप जुळत नाही विविध भौगोलिक स्थळांच्या क्षेत्रभेटी करणारी मुले मोठ्या प्रमाणात कधी भेटणार. केवळ सहली हीच त्यांचे पर्यावरणाचे जाणून घेण्याचे अपुरे प्रयत्न हे खूप व्यापक व सजगपणे करण्याची गरज आहे. धर्मस्थळांना व पर्यटनाला पालकांच्या वरून जाणारी सर्वच ठिकाणची मुले ही लहान वयात सगळे निसर्ग ज्ञान मिळवणार कधी त्यासाठी ती जाणीव तरी निर्माण झाली आहे काय?

निसर्ग ज्ञानाची जाणीव समाज जीवनातील सर्व प्रकारचे प्रदूषण प्रचंड वेगवान जीवना चा संघर्ष सतत आपण कशासाठी धावत आहोत .याचा विचार करणारे पालक पालक बैठकीमध्ये खूप काही बालविकासाचे प्रयत्न संयुक्तपणे शाळा व पालकांनी करायला हवेत. असे सुचवताना आढळत नाहीत. पालक सभांना सह्या करण्यापूर्ती हजेरी लावणारे बहुसंख्यांक महिला पालक दिसतात. जे मुलाच्या अभ्यासाचे प्रगतीचे जुजबी ज्ञान मिळवितात. मानसशास्त्रीय दृष्ट्या मुलाच्या समुपदेशनासाठी काय करायला हवे? नवे छंद, नवाबौद्धिक विकास व्यक्तिमत्त्वात संपादित करण्यासाठी अनेक प्रकारची गुणवैशिष्ट्ये कोणती? त्यातील आपल्या मुल विकसित त्यातील.प्रक्रियेशी होत जाणारे एक कौशल्य कोणते? शोध घेत नाहीत.. याचा व्यापक स्तरावर पालक व शिक्षक आणि समाज ही गांभीर्याने विचार करीत असताना दिसत नाहीत. त्यामुळे मुलांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व खेळ संगीत चित्रकला नृत्य नाट्य संगीत वादन विविध कलांच्या मध्ये हनुमान होणारी मुले मोठ्या प्रमाणात गर्दीने दिसून येत नाहीत. सतत हातात निसर्ग कथा प्राणी कथा शास्त्रज्ञांचे चरित्र. प्रायोगिक मॉडेल्स अनेक प्रकारची करणारी मुले बातम्यांची कात्रणे जमवणारी मुले चित्रांचा संग्रह जमवणारी मुले अक्षरांच्या सरावासाठी विविध अक्षरांची नमुने गोळा करणारी मुले सर्व

धर्मांच्या क्षेत्रभेटी देणारी मुले ही समाज एकात्मतेची गोष्ट ती खूप आवश्यक शैक्षणिक गोष्ट आहे. हे कुणाच शिक्षण जगातील घटकाला महत्त्वाचे वाटप नाही. त्यामुळे सातारची मुले सर्वधर्मसमूहाच्या प्रार्थना गंभीर आवाजात म्हणताना प्रसन्न वातावरण निर्माण करताना दिसत नाहीत.

शांतता आणि एकाग्रता ही आजच्या काळात तील दुर्मिळ बाब झाली आहे. निरामय शांततेचे मन ही शाळांनी तयार करायची गुण कौशल्यांची बाब असते. ही शाळा ही अभ्यासक्रमाच्या भाराने नेवाक लेली असल्यामुळे त्याकडे महत्त्व देत नाही. त्यामुळे अस्थिर. भय, चंचल सतत पालक आणि शाळा यांच्या सूचनेच्या दबावाकडे चिखली मुले सर्वत्र दिसून येतात. उच्चभ्रू इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पालक आणि त्या विद्यार्थ्यांचे पोशाखी वर्तनआढलुन येते .सेमी इंग्रजी ते इंग्रजी माध्यम याचा अनाठा ही अभिमान बाळगणारे. सर्व जण हे सर्व बघितले की मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यम ही एक वाढत चाललेली विषमता आणि विद्यार्थी संख्येने एकीकडे घट तर दुसरीकडे अतिरिक्त वाढ ही विषमता ज्ञानाची नसून केवळ अनुकरण केवळ भीती आणि मूल घडवण्याच्या अज्ञानाचे लक्षण पालकांच्या मध्ये आढळून येते.

सातारची मुले क्वचित व्यायाम शाळेत शहरातील इंनमिन तीन चार व्यायाम शाळांच्या मध्ये दिसून येतात. व्यायामातील त्यांचा सातत्यपूर्ण वावर हा ही साताऱ्यात कुठे आठवण येत नाही. हा नकारात्मक दृष्टीकोन नाही. व्यापक स्वरूपात नित्य योगा जोर बैठका मारणारी बहुसंख्यांक मुले कुठेच दिसत नाही. फक्त क्लासच्या समोर शाळांच्या गेटवर गौंगाट मुले हे शिक्षण जगताचे आपोआप शिक्षण विकासाचे आशावादी दृश्य दिसून येते. ही सर्वांनाच आकस्मातील उद्रेक रूपातील आपल्या मुलांचा व्यक्तिमत्व विकास होत राहील. असा वाटणारा भोळा आशावाद सातारच्या अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या पालकांकडे दिसून येतो.

सगळ्या प्रकारच्या महोत्सवाला पालकांच्या सोबत हजेरी लावणारी मुले ही एक नवेच मुलांना हे दाखवले ते दाखवले ते घेतले हे घेतले हे गरजा पूर्ण पुरवणारे पालक व विद्यार्थ्यांचे वाढते प्रमाण हे संचय वादाकडे नेणारे सार्वत्रिक विद्यार्थ्यांचे वर्तन वाढत चालले आहे. म्हणून सातारची मुले पालकाच्या सवलती उपभोगणारी मुले क्लासला जाणारी मुले शाळा महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमाच्या ओझ्या खाली दबलेली मुले खूप दिसून येतात त्यांचे सगळे मनोविश्व सतत विकसित होताना फुलताना मनाचा विकास भावनांचा विकास बुद्धीचा विकास या संख्या मनोबुद्धीचे वर्तन ही प्रक्रिया कोणी समजावून घेताना दिसत नाही? विषमतेच्या गटात विभागलेले बाल जगत सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत कधी येणार ?एकात्मतेच्या व्यापक घोषणा मुलांच्या कधी ऐकावयास मिळणार? मुलांना पुन्हा पालक आणि शाळा एका अभिमानवादी मराठी असणे, हिंदू असणे आणि अपघाती जातीच्या मध्ये जन्मने यातच बंदिस्त करण्याचे प्रयत्न सार्वजनिक पातळीवर शिस्तबद्ध पद्धतीने केवळ अभिमानाच्या संसर्गामुळे चालू आहेत. असे खूप दुःखदायक दृश्य दिसून येते. आणि समितीची गीते गाणारी मुले इतिहासाच्या गडकोट किल्ल्यांच्या पलीकडे व्यक्तींचा समाजाचा इतिहास असतो ते वर्तमान हे असते. आपले शहराचे गावाचे वैभव असणारी कालच्या पिढीतील वृद्ध वंदनीय पिढी ती कुणी समजावून घेताना सातारची मुले दिसत नाहीत. सातारला वाडे दगडे आणि किल्ले एवढाच इतिहास नाही. तर इथे अन्यायाच्या विरुद्ध संघर्ष करायला हवा घेतले सामूहिक ऐतिहासिक वारसा असलेले वर्तन विकसित होताना दिसत नाही. ऐक्य निबंधूभावाचा घट्ट झाला शाळा समाज विणताना दिसत नाही. तुटलेला समाज तुटलेली नाती विस्कटलेली समाजाची घडी आणि भकास होत असलेली खेडी ही बालकांच्या विकासाला कशी काय विकसित करू शकतात?. हा स्वतःलाच बालविश्वाचा शोध घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पडलेला सर्व ठिकाणचाच प्रश्न आहे.

सातारची मुले ढोल वाजवणारी मुले ,फेटे बांधणारी मुले, प्रार्थना गृहात जाणारी मुले ,हातात दोरा बांधणारी मुले बैठकाला जाणारी मुले ,गंध लावणारे मुले ,थोरांची चरित्र वाचताना दिसत नाही आजी आजोबांच्या सोबत बसलेली खेळलेली रमलेली गावाकडे सतत राहणारी मुले कुठेच नाहीत. शहराकडे पालकांसोबत पालकांच्या गतीनुसार अपेक्षा नुसार बालकांच्या स्वप्नांसाठी साधन भूत ठरलेली सातारची मुले हा कुटुंब घडवणार गाव घडवणार साताऱा घडवणार आणि राष्ट्र घडवणार या निर्माण कार्यात कुठे असतील? असा एक अत्यंत भविष्यातील काळजीचा संकटाने व्यापलेला प्रश्न छळत राहतो ,आणि म्हणून सातारची मुले ही बोलणारी मुले खेळणारी मुले ग्रंथालयात पुस्तकातडोके खूपासून बसणारी मुले सतत दिसत नाहीत. धावणारी ,खेळणारी स्पर्धेसाठीच सर्व काही काही प्रयत्न करणारी मुले हे आघोरी स्पर्धेचे जिद्द नि प्रयत्नाने वाकलेल्या मनांचे दर्शन आहे. हे मनोविश्व हे सातारच्या मुलांचेच नव्हे तर सर्वत्र समाज जीवनाचा स्पर्धा स्पर्धा मार्क मार्क श्वास व ध्यास बनला आहे..उच्च शिक्षनानतर पैसा: पैसा: हा एक चला पुढे पळा पुढे पळा कोण धावतो बघा हा मार्ग सर्वांनी स्वीकारला आहे.

यामध्ये निवांत, शांत ,बाल जगताचे निरपेक्ष हसणे, बागडणे सर्वांनाच अनुभवास येत राहो. हे बाल जगताचे सातारच्या मुलांचे वर्तमान कोण घडवणार? पुस्तकाच्या पलीकडे समाज नावाचा शिक्षक आहे? निसर्ग नावाचा गुरु आहे. आई-वडिलांच्या आजी आजोबा यांचा मायेचा एक अनामिक सागर आहे. कधी दिसणार. तो सर्व मुलांना सातत्याने शोधाकडे कारणाकडे, निर्माण एकरूप वर्तनाकडे, कधी पोहोचवणार? असा एक विसंगत वाटणारा आशावाद प्रस्तुत शिक्षक कार्यकर्ता बाळगतो. आणि सातारच्या मुलांचे निरंतर अक्षर नाते कधी जुळले जाणार? त्यांची अक्षर पंढरी कधी फुलणार? अशी वेडगळ स्वप्न पाहत स्वतःच मुलांना विविध पुस्तके वाटत राहतो आणि त्याला झपाटून पुस्तके वाचणारी मुळेबकधीतरी भेटतील? अशा आशा तो (प्रस्तुत शाळा शिक्षक) बाळगत राहतो ? सातारच्या मुलांचे हे विश्वाचे अंतरंग शोधत राहतो. समाजमनाचा हा भरकटलेला भौतिक चंगळवादाच्या दिशेने धावणारा अघोरी स्पर्धेने नैरशाकडे पोहोचवणारा प्रवास तो शब्दबद्ध करतो ,आणि पुन्हा बालविश्वाच्या अंतरंग आपल्याला कळालेच नाहीत. इतकी संमिश्रता विसंगती हे गतिमान समाजाचे नवे वास्तव नवे पर्यावरण सतत पुढे येत असल्याने अस्वस्थ होत राहतो. गती बदल आणि वर्तमान हे सगळे एकमेकांच्या परिणामाचे परिणाम

हा सगळ्यात क्षेत्रातील बदलाचा द्वदवात्मक अनुभव सतत येत राहतो आहे .आंतरविरोध, विखंडन आणि अपरिहार्यता स्वीकारलीच पाहिजे. अशी बदल शरण मानसिकता हा वर्तन भाव समाजाला सगळ्याच बदलाच्या पासून वेगाने पुढील घेऊन जात आहे. हा बदल नव्हे तर ते जाळ्यात अडकवलेल्या भांडवल व्यवस्थेचे आणि धर्म व्यवस्थेच्या श्रद्धेचे अनाकलनीय समाजवर्तन असून, त्यानेच सातारचीच नव्हे ,तर शिक्षण क्षेत्रातील मुले व पालक ही ग्राहक कोणी शिक्षणाच्या बाजारपेठेनेच बनवली नाहीत. असे कोणास म्हणता येणार नाही. शिक्षण क्षेत्रातील बाजारात वस्तू विकणारे समाजातील असंख्य घटक, समाजाच्या भविष्याचा कोणता प्रवास रेखाटतात? कोणते निर्माण चित्र डोळ्यापुढे ठेवतात?

किंबहुना असे प्रश्न तरी मूळ नावाच्या अनमोल जैविक अमर्याद क्षमता असलेल्या या आनंदी मुल( साधनाला) मानवी संस्कृतीच्या गतीचक्रातील साखळीला संकटकाळी;कोणी ओढेल का? ही धावणारी स्वार्थाची आगगाडी थांबवेल का ?असे असंख्य प्रश्न उभे राहतात. सातारची मुले.. या प्रश्नाचे उत्तर मिळवण्यात आपण व्यस्त राहायला हवे हा प्रश्न छळत राहतो.

**लेखक**
**शिवाजी सोनुबाई पांडुरंग राऊत.**
**सातारा .**

## श्री व्यंकटेश महाविद्यालयात भारताचे संविधान ग्रंथ व उद्देशिका वितरण संपन्न

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारताचे संविधान ग्रंथ व उद्देशिका वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. मुख्याधिकारी तथा प्रशासक अरुण मोकळ यांच्या अध्यक्षतेखाली आमदार मनोज कायंदे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, शिवसेना नेते छगनदादा मेहेत्रे, डॉ. राम प्रसाद शेळके, मोहम्मद सिद्दीकी, डॉ. भगवान खरात, ड. रवींद्र एडके, तहसिलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसिलदार सायली जाधव, वनपरिक्षेत्र अधिकारी उमेश गायकवाड, पोलीस निरीक्षक संतोष महल्ले, ड. विजय सूनगत व इतर मान्यवरांच्या हस्ते विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची प्रत व उद्देशिका वितरीत करण्यात आले.

**सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांचा स्तुत्य उपक्रम**

भारतीय लोकशाही बळकट ठेवण्यासाठी भारताचे संविधान किती महत्त्वाचे आहे हे डॉ. खरात यांनी पटवून दिले. याप्रसंगी श्री व्यंकटेश महाविद्यालय,न प छत्रपती श्री शिवाजी महाराज हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, देऊळगाव राजा कनिष्ठ महाविद्यालय, दीनदयाल विद्यालय, सहकार विद्या मंदीर, महात्मा फुले कृषी तंत्र विद्यालय यांच्यासह विविध शाळेतील विद्यार्थ्यांना संविधान व उद्देशिका वितरीत करण्यात आल्या. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनेक महनीय व्यक्तींना भारताचे संविधान ग्रंथ, उद्देशिका व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक व उद्देशिका वाचन या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मधुकर जाधव यांनी केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदीप हिवाळे यांनी केले. अतिशय स्तुत्य उपक्रम आयोजित केल्याबद्दल चंद्रकांत खरात यांचा मान्यवरांच्या हस्ते कौटुंबिक सत्कार करण्यात आला.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५


## थोडक्यात...

### कडी–कोंयडा तोडून रक्कम सह दागिने लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) घरातील मंडळी बाहेर गेल्याचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचा कडी–




कोंयडा कशाने तरी तोडून घरात प्रवेश करून घरातील बेडरूम मधून रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण १९ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २५ ते २६ जानेवारी दरम्यान गणेश नगर बाळे येथे घडली. याप्रकरणी संजय नागनाथ दोरकर (वय–४२,रा.जोशी गल्ली, बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक भिमदे हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) मार्कंडेय हॉस्पिटल समोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीएक्स.५६४६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ जानेवारी रोजी सकाळी आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी राम सदाशिव भंडे (वय–४०,रा.राहुल गांधी झोपडपट्टी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक फौजदार कणगिरी हे करीत आहेत.

# सर्व खाजगी रुग्णालयांनी जीबीएस रुग्णांची माहिती तात्काळ आरोग्य यंत्रणेला दिली पाहिजे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## जीबीएस(गुईलेन बॅरे सिंड्रोम) आजार संसर्गजन्य नसल्याने नागरिकांनी घाबरू नये, काळजी घ्यावी

**■ पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार जीबीएस आजाराच्या उपचारासाठी प्रतिबंधात्मक औषधे तसेच इंडक्शन स्टडी मशिनरी साठी दोन कोटीचा निधी**

**■ जीबीएस आजाराबाबत आरोग्य यंत्रणेने तात्काळ जनजागृती मोहीम राबवून उपाययोजनांची माहिती द्यावी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्ह्याच्या ग्रामीण, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालयांकडे गुईलेन बॅरे सिंड्रोम (ऋड्ड) आजाराचा रुग्ण आढळल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ संबंधित शासकीय आरोग्य यंत्रणेने घेऊन त्याचा दैनंदिन अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जीबीएस आजाराच्या अनुषंगाने आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. संजीव ठाकूर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या आरोग्य यंत्रणेला खाजगी रुग्णालयातील जीबीएस आजाराच्या रुग्णांची दैनंदिन माहिती घेण्याबाबत करण्याचे निर्देश दिले तसेच नगरपालिका क्षेत्रातील रुग्णांच्या माहितीसाठी जिल्हा शिल्लक चिकित्सक त्यांच्या अंतर्गत च्या वैद्यकीय अधिक्षक यांनी नगरपालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालयांच्या बैठका घेऊन त्यांना या आजाराबाबत मार्गदर्शन करावे तसेच त्यांच्याकडून दैनंदिन रिपोर्ट घ्यावा तर सोलापूर शहरातील जीबीएस आजारांच्या रुग्णाबाबत महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेने शहरातील सर्व खाजगी रुग्णालयांच्या स्वतंत्र बैठक आयोजित करून त्यांना या आजाराच्या अनुषंगाने माहिती देऊन त्यांच्याकडून दैनंदिन अहवाल मागून घ्यावा उपरोक्त सर्व शासकीय यंत्रणांनी दैनंदिन अहवाल प्राप्त करून तो अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा. जे खाजगी रुग्णालय जीबीएस आजाराच्या रुग्णांची माहिती देणार नाहीत अशा रुग्णालयावर विहित नियमावलीनुसार कारवाई करावी, असे त्यांनी सुचित केले.

ग्रामीण भागातील मोठ्या गावामध्ये जिल्हा परिषदेने पाणी नमुन्याची तपासणी करावी तसेच जीबीएस आजाराच्या लक्षणांच्या अनुषंगाने सर्वेक्षण करावे. हीच मोहीम नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात संबंधित यंत्रणांनी राबवावी. तसेच या आजाराच्या अनुषंगाने सर्वसामान्य नागरिकांना माहिती हवी यासाठी ग्रामीण नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात होर्डिंग बॅनर जिंगल याद्वारे उपायोजना प्रतिबंधात्मक कारवाई तसेच नागरिकांनी घ्यावयाची काळजी या अनुषंगाने जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. तसेच नागरिकांनी घाबरून जाऊ नये, हा आजार संसर्गजन्य नाही यामध्ये योग्य काळजी व दक्षता घ्यावी. दूषित पाणी पिऊ नये व कच्चे मास खाऊ नये असे आवाहन त्यांनी केले.

**जीबीएस आजाराचे पाच रुग्ण सोलापूर जिल्ह्यात आढळलेले असून त्यातील एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती असून उर्वरित चार रुग्ण हे उपचार घेत असून हे चारही रुग्ण सोलापूर जिल्ह्याबाहेरील असल्याची माहिती आरोग्य यंत्रणा कडून यावेळी देण्यात आली. तसेच या आजाराच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या वतीने जनजागृती करण्यात येत असून शासकीय रुग्णालयामध्ये आवश्यक राखीव बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे.**

अन्न औषध प्रशासनाने जिल्ह्यातील हॉटेलमधील पाणी व अन्नाचे नमुने घ्यावेत. जे हॉटेल चालक स्वच्छता ठेवणार नाहीत अशा हॉटेल चालकाना नोटीस द्याव्यात. पाणीपुरी व अन्य तत्सम फूटपाथ वरील पदार्थांचेही नमुने घेऊन त्याची तपासणी करावी. कुठेही अस्वच्छता व दूषित पाणी आढळल्यास त्यांना नोटीस देऊन पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. आयुष्यमान भारत योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणीकृत झालेल्या खाजगी रुग्णालयांनी जीबीएस आजाराच्या रुग्णावर योजनेअंतर्गत मोफत उपचार करावे. जे रुग्णालये असे करणार नाहीत त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

या आजाराच्या उपचारासाठी प्रतिबंधात्मक औषधे तसेच इंडक्शन स्टडी साठी आवश्यक मशिनरी घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून माननीय पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार तात्काळ दोन कोटीचा निधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला देण्यात येणार आहे. तसेच यासाठी अतिरिक्त निधी आवश्यक असेल तोही उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

# प्रजासत्ताक दिनी कु. आकांक्षा ज्ञानबा गायकवाड यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रिसोड/प्रतिनिधी : जानेवारी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम यांच्या वतीने दरवर्षी दिले जाणारे जिल्हा युवा वैयक्तिक पुरस्कार आज भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त वाशिम येथील पोलीस कवायत मैदान येथे वितरण करण्यात आले. यामध्ये रिसोड तालुक्यातील ग्राम. व्याड येथील कु. आकांक्षा ज्ञानबा गायकवाड यांना सन २०२४–२५ चा (युवती) जिल्हा युवा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार यासाठी देण्यात आला की या त्यांनी गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केलेले आहे. त्यामध्ये पर्यावरणाचे संवर्धन, जलसंवर्धन, आरोग्याच्या बाबतीत विविध उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, महिला सक्षमीकरण, शोषित, पीडित जनतेसाठी सतत सहकार्य, विविध महापुरुषांच्या



विचारांचा जागर केला आहे. शासनाच्या विविध सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग,शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेची जनजागृती व गावोगावी जाऊन माहिती दिलेली आहे, कॅच द रेन, रक्तदान शिबिर, सिकलसेल,ऍनिमिया तपासणी,तसेच बेवारस गरीब मनोरुग्ण दिव्यांग गरजू यांना मदत तसेच मतदान दिनी मतदान केंद्रावर मदत करून जनजागृती केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत राज्यपाल प्रणित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन आव्हान शिबिर गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व उत्कर्ष सांस्कृतिक शिबिर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे, २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सो नाशिक येथे,मेरी मिट्टी मेरा देश कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व हे राज्यस्तर मुंबई आणि राष्ट्रीय स्तरावर दिल्ली येथे मुख्यमंत्री,राज्याचे केंद्रीय मंत्री सांस्कृतिक मंत्री व केंद्रीय खेल मंत्री आणि देशाचे पंतप्रधान यांच्या उपस्थितीमध्ये विविध कार्यक्रमांतर्गत प्रतिनिधित्व केल्याबद्दल.ह्या सर्व बाबीचा विचार करून हा अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा जिल्हा युवा पुरस्कार कु.आकांक्षा ज्ञानबा गायकवाड सोबत वडील ज्ञानबा गायकवाड यांना उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय व शिक्षणमंत्री तथा वाशिम जिल्हा पालकमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते व जिल्हा जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस,जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, अपर जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,जिल्हा क्रीडा अधिकारी लता गुप्ता, क्रीडा अधिकारी मारुती सोनकांबळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, न.प मुख्यकार्यकारी अधिकारी श्री.गायकवाड व अपर पोलीस अधिक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या आदी मान्यवरांच्या हस्त – या सर्वांना हा पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आला.

**पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा क्रीडा अधिकारी व आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रदान**

कार्यक्रमाचे संचालन राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालयाचे प्रा.मोहन शिरसाट यांनी केले.या कार्यक्रमाला मारुती सोनकांबळे क्रीडा अधिकारी, संतोष कोकाटे क्रीडा अधिकारी, अक्षय टेम्भूर्णीकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक पूजा भटकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक विजय बोदडे, वरिष्ठ लिपिक भारत वैद्य,विकास तिडके,सुशांत कडणे आदी जणांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार बांधव, नागरिक व विविध शाळेचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागातील पहिली माहीला हा पुरस्कार मिळवण्याचा मान घातल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अम्रतसर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा विटंबना घटनेचा नळदुर्ग येथे जाहीर निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : पंजाब राज्यातील अमृतसर येथील मुख्य चौकात असलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यावर चढून हातोडीने पुतळ्याची तोड फोड करून व पुतळ्याच्या चंबुत्यावर आग लावून एका जातीवादी माथेफिरूने डॉ .बासाहेब आंबेडकरांनीची विटंबना केली असून सदर निंदनीय घटणेचा तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले ) च्या वतीने तिव्र जाहीर निषेध करण्यात आला असून आरोपी मातेफिरूवर देशद्रोहाचा गुन्हा दाखलं करण्याची मागणी करण्यात करण्यात आली आहे.

या संदर्भात रिपाइं(आठवले ) नळदुर्ग शहर शाखेच्या वतीने

**अरोपीवर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची केली मागणी**

व भारतील दलित पँथरच्या वतीने नळदुर्ग पोलीस ठाणे चे पोलीस निरिक्षक गजेंद्र सरोदे यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की दि.२६ जानेवारी २०२५ रोजी संबंध देशभर प्रजासत्ताक दिनाचा अमृत मोहत्सवी वर्धापन दिन मोठ्या थाटामाटात उत्साहाने व विविध उपक्रमाने साजरा करत असताना पंजाब राज्यातील अमृतसर येथे मात्र एका मनुवादी जातीयवादी माथेफिरूनी भारतीय संविधानाचे शिल्पकार लोकशहीचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना केली. ही घटना अतंत्य निंदनिय असून या घटने चा जाहर तिव्र निषेध करण्यात येत असून आरोपी माथेफिरुवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यार येत आहे. नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक याना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइंचे धाराशिव जिल्ह समन्वयक एस.के. गायकवाड,अरुण लोखंडे, रिपाइं (आठवले) चे नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे,दलित पँथरचे जिल्हा संपर्क प्रमुख शामकांत नागीले,. जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी,देवानंद बनसोडे रिपाइं तालूक संघटक सुरेश लोंढे, आरविंद लोखंडे, डीबीएन संस्थेचे तालूका अध्यक्ष उमेश गायकवाड, आदींच्या सह्या आहेत.

**उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते दिव्यांगांना निधीचे वाटप**

**ग्रामपंचायत गोगांव व विविध सामाजिक संघटनेकडून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप**

# ७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रामपंचायत गोगांव येथे सरपंच वनिता सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : ७६ प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रामपंचायत गोगांव येथे सरपंच सौ वनिता मधुकर सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रा. सदस्य लक्ष्मण बिराजदार हे होते, डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन शरणपा कलशेट्टी व अनिल मुलगे यांनी केले ध्वजकट्टाचे पुजन तंटा मुक्त समिती अध्यक्ष महादेव पाटील यांनी केले. यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ ग्रामपंचायत सदस्य प्रदीप जगताप, ललिता कलशेट्टी डॉ लिंगराज नडगेरी मुख्याध्यापक पूडलिक वाघमारे सूर्यकांत जिरगे, यासह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्राम सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विविध विकास कामाबाबत चर्चा करण्यात आली,आरोग्य विषयी माहिती देण्यात आली, कुष्ठरोगाबाबत सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.यावेळी सरपंच वनिता सुरवसे यांनी मार्गदर्शन केले व सरपंच वनिता सुरवसे आणि उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते दिव्यांगाना चेक वाटप करण्यात आले.



जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा गोगांव येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे हे होते .प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच वनिता सुरवसे ग्रा. प. सदस्य लक्ष्मण बिराजदार, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप व सर्व सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. प्रारंभी माजी सरपंच जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी प्रतिमा पूजन डॉ. लिंगराज नडगेरी, सुधीर जगताप यांनी केले, ध्वजकट्टा पुजन पंडित मुळजे यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेची प्रगती व कामकाज बद्दल मुख्याध्यापक पुंडलिक वाघमारे यांनी प्रास्ताविक सादर केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे भाषणे तथा विविध गुणदर्शन कार्यक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने सादर करण्यात आले इयत्ता पहिली ते सातवीतील सर्व मुला–मुलींनी सहभाग नोंदवून देशभक्तीपर गीत, लोकगीत, अशा सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी सादर केली. यावेळी ग्रामपंचायत गोगांव व विविध सामाजिक संघटनेकडून विध्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ,पुंडलिक वाघमारे,शंकर कारभारी,छाया भोसले,महादेव चव्हाण, ज्योती आलुरे,सुधीर जगताप, गंगाधर कोंडे, परमेश्वर गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शंकर कारभारी यांनी केले.

## थोडक्यात...

### तुम्ही रूम मला कसं देत नाही तुम्हाला दाखवतोच म्हणत केली मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : दक्षिण कसबा चौपाड येथे तुम्ही रूम मला कसं देत नाही तुम्हाला दाखवतोच. माझ्या भावाला सांगून मारायला लावतो असे म्हणत मारहाण केल्याची घटना २७ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी मंहमद शाकीर अब्दुल वहाब जमादार (वय-३८,रा.दक्षिण कसबा चौपाड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून तौसिफ जमादार,तस्लिम तौसिफ जमादार (रा.दक्षिण कसबा,चौपाड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादी हे जेवण करण्यासाठी घरी आले होते.यावेळी फिर्यादीच्या आई व बहीण हे घरात होते.फिर्यादी घरात गेले असता बंद असलेल्या रूमचा प्लायवूड असलेला दरवाजा संशयित आरोपी क्रमांक एक यांनी कोणत्यातरी लोखंडी हत्याराने तोडण्याचा प्रयत्न केला.तेव्हा दोन्ही संशयित आरोपींनी प्लायवूडचे कपाट तोडून फिर्यादीच्या घरात आले. तेव्हा फिर्यादीने माझ्या घरात का आले अशी विचारणा केली असता यातील संशयित आरोपी तसलीम जमादारने हातातील लोखंडी वस्तूनी डोक्यात मारून जखमी केले. तसेच संशयित आरोपी तौसीफ जमादार यांने लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहेत.

### तू माझ्या भावाला दम देतो का म्हणत चौघांनी केली मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : लोधी गल्ली येथे तू माझ्या भावाला दम देतो का म्हणून चौघांनी मारहाण केल्याची घटना २६ जानेवारी रोजी घडली.याप्रकरणी राज शंकर बालाजीवाले (वय-२३,रा.लोधी गल्ली) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून कृष्णा उर्फ इल्या दिलीप मौलावाले, विनोदी दीपक मौलावाले, अक्षय चौधरी, विनीत शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार काळे हे करीत आहेत.

# अहिल्या पुलास समांतर नवीन पूल होणार : आ. समाधान आवताडे

## केंद्रीय सडक मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ कोटींचा निधी मंजूर केला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर आणि टेम्भूर्णी मार्गावर भीमा नदीवर आणखी एक पूल होणार असून येथील अहिल्या पुलास समांतर अशा नवीन पुलासाठी केंद्रीय सडक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली. या पुलासाठी आ. आवताडे यांनी ना. गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

पंढरपूर शहरात येणाऱ्या वाहनांची संख्या दरदिवशी वाढत आहे, मात्र भीमा नदीवर पंढरपूर जवळ सध्या एकच नवीन पूल आहे, आणि टेम्भूर्णी मार्गावर असलेला अहिल्या पूल ४५ वर्षे जुना



आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरतो आहे. दरवर्षी भीमा नदीला पूर आला कि हा पूल पाण्याखाली जातो आणि वाहतूक ठप्प होते. शिवाय अहिल्या पूल जुना असल्याने त्यावरून वाहतूक करणे धोकादायक ठरते आहे. आजवर अनेक वाहने या पुलावरून भीमा नदीमध्ये पडलेली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्या पुलाजवळ आणखी एका समांतर पुलाची गरज होती. आणि आ. समाधान आवताडे यांनी या पुलाची मागणी केली होती. त्या नवीन पुलासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ . ७१ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. एन एच ५६१ ए या टेम्भूर्णी - पंढरपूर - मंगळवेढा या मार्गावर हा पूल होणार असून सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ रोजी या पुलाच्या कामास ना. गडकरी यांनी मंजुरी दिली आहे. या पुलाच्या तांत्रिक मान्यतेनंतर २०२७ अखेर पुलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहर आणि मतदार संघातील विकासासाठी, जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेतला आहे. यामुळेच या मतदारसंघातील मतदारांनी त्यांना पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात काम करत असताना, विविध भागात अनेक प्रकारच्या विकास कामाचा निधी पोहोचविला आहे. त्याच धर्तीवर आणखी एक नव्याने पूल करण्याची मागणी केली असता. हा निधी मंजूर करून पंढरपूरकरासाठी आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**आमदार समाधान आवताडे यांनी तरुणांच्या हाताला काम लवकरात लवकर मिळावे यासाठीही एमआयडीसीची लवकर निर्मिती होण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. पंढरपूर शहरातील अनेक विकास कामामुळे आमदार समाधान आवताडे यांच्या कामाची मोठी ओळख निर्माण झाली आहे.**

# प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व रोग निदान शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : २६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त व अँड बादल यादव यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व रोग निदान शिबिर आयोजित केले होते.

पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके डॉक्टर मुंडे प्राचार्य ढवळे शालेय विद्यार्थ्यांना यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तसेच रेशन कार्ड ऑनलाइनश व विविध शासकीय कर्जाबाबत माहिती

कॉम्प्युटर कोर्स, टायपिंग कोर्स, इंग्लिश स्पीकिंग कोर्स या संदर्भात मोफत व सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले होते उपस्थित मान्यवरांना संविधानाची उद्देशका देऊन सन्मान करण्यात आल्या पंढरपूर शहर व ग्रामीण भागातील. नागरिकांना मोफत योजना उपलब्ध करून दिल्या.




विषय मध्ये प्रत्येक वर्षी नित्यनेमाने हा उपक्रम राबवला जात असतो

**अ‍ॅड. बादल यादव यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिराचे आयोजन**

यावेळी महिला व तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी लक्ष्मण पापरकर, नानासाहेब वाघमारे, दुर्योधन यादव, अनंता नाईक नवरे, नितीन कांबळे, धनंजय साठे, उमेश पवार, अँड राजेश चौगुले, विदुला अदटराव, अशोक पाटोळे, मुकुंद गाडगे जयसिंग मस्के, गणेश वाघमारे, बापू वाघमारे, डॉक्टर पाटोळे, फाळके, डी राज सर्व गोड, अँड कीर्तीपाल सर्व गोड, किरण घाडगे इत्यादी जण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# नोंदणीकृत सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करा अन्यथा भाव फरक द्या : संतोष सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लातूरः राज्यात हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत केवळ साडेतीन लाख शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी झाले. आजही ४ लाख शेतकरी खरेदीच्या प्रतिक्षेत आहेत. तर खरेदीची मुदत ३१ जानेवारीला संपत आहे. सरकारने एतकर मुदत वाढवून नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करावे किंवा या शेतकऱ्यांना भाव फरक द्यावा, अशी मागणी राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली.

सोयाबीन खरेदीची अंतिम मुदत दोन दिवसांवर आली. मात्र आजही नोंदणी केलेल्या निम्म्या शेतकऱ्यांनाचेही सोयाबीन खरेदी झाले नाही. आजही नोंदणी करून ४ लाख शेतकरी नाफेडच्या संदेशाची वाट पाहत आहेत. मात्र सरकारला याचे गांभीर्य दिसत नाही. बाजारात आजही हमीभावापेक्षा ८०० ते ९०० रुपये कमी भाव मिळत आहे. सरकारला सोयाबीन देण्यासाठी शेतकरी मागील ३ महिन्यांपासून थांबले आहेत. सरकारने या शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी केले नाही तर शेतकरी अडचणीत येतील. तसेही सरकारने १४ लाख १३ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट दिले. खरेदीही सुरु केली. पण प्रत्यक्षात खरेदी झाली नाही. त्यामुळे १५-१५ दिवस बारदाणा मिळाला नाही, शेतकऱ्यांचे सोयाबीन वेळेत खरेदी केले जात नाही, पेमेंट वेळेत मिळत नाही.

ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया किचकट केली त्यामुळे उद्दीष्ट १४.१३ लाख असतानाही मागच्या १०५ दिवसांमध्ये केवळ ७ लाख ५४ हजार टन खरेदी झाली. म्हणजेच केवळ ५३ टक्के उद्दीष्ट पूर्ण झाले. आजही ४ लाख शेतकऱ्यांनी सरकारला सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली आहे. हे शेतकरी खरेदीची वाट पाहत आहेत. सरकारनेच शेतकऱ्यांना हमीभावाचे आश्वासन दिले आहेत. या आश्वासनावर विश्वास ठेऊन ४ लाख शेतकरी वाट पाहत आहेत. सरकारने या शेतकऱ्यांचा विश्वास तोडू नये. सरकारने एतकर खरेदीला मुदतवाढ देऊन जोपर्यंत या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होत नाही तोपर्यंत खरेदी सुरु करावी. पण जर सरकारला खरेदी करणे शक्य नसेल तर या शेतकऱ्यांना बाजारभाव आणि हमीभावातील फरक द्यावा, अन्यथा आंदोलन केले जाईल, असाही इशारा संतोष सोमवंशी यांनी दिला.

# कॅनरा रोबेको मॅच्युअल फंड यांच्यावतीने पंढरपूर शहरातील व तालुक्यातील १२५ मुलींना सायकल वाटप : मा.आ. प्रशांत परिचारक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील व तालुक्यातून दूर अंतरावरून चालत येणाऱ्या होतकर विद्यार्थ्यांना मोफत सायकलीचे वाटप टिळक स्मारक मैदान येथे करण्यात आले आहे.

पंढरपूर शहर व तालुक्यातून अनेक भागात आजही मुलींना त्यांच्या शिक्षणासाठी अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. व अनेक गावात पाचवी नंतरही किंवा दहावी नंतरची शिक्षण सुविधा नसल्यामुळे अनेक मुलींना परगावी जाऊन शिक्षण घ्यावे लागतील, मात्र शाळेपर्यंत जाण्यासाठी मुलींना कुठलीही वाहतूक सुविधा नाही किंवा तुटपूजा स्वरूपाच्या सुविधा आहेत. त्यामुळे अनेक मुलींचे शिक्षणही बंद केले जाते. आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेक कुटुंबातील पालक आपल्या मुलींसाठी वाहतूक सुविधा किंवा सायकल खरेदी करू शकत नाही त्यामुळे अनेक मुलींना शिक्षण सोडावी लागते त्यामुळे शाळेत मुलींची मोठी गळती होती वही गळती थांबवण्यासाठी सरकारने मुलींना शाळेपर्यंत जाण्यासाठी मोफत सायकल अनुदान योजना सुरू केली आहे त्यामुळे अनेक मुलींना शाळेत ये जा करण्यासाठी सायकल उपलब्ध होत आहेत. त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होत असून शिक्षण घेण्यात मुलींची सक्षम संख्या ही वाढत आहे.

यावेळी बोलताना परिचारक म्हणाले की कॅनरा रोबेको मॅच्युअल फंड यांच्यावतीने हा अत्यंत उपयुक्त उपक्रम राबवण्यात आला आहे पंढरपूर शहर व तालुक्यातून १२५ विद्यार्थिनींना सदर सायकलीचे वाटप माझ्या हस्ते करण्यात आले विद्यार्थ्यांच्या वेळेची बचत होऊन त्यांचे आरोग्य ही सुदृढ राहावे व या मागचा प्रमुख उद्देश आहे विद्यार्थ्यांनी सायकलीचा योग्य वापर करून प्रगती साधावी असे आव्हान मा.आ. प्रशांत परिचारक यांनी केली.

तसेच मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्वाच्या आहे त्यामुळे मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सामाजिक विकास करण्यासाठी सरकारच्या वतीने विविध योजना राबवल्या जातात या योजनेच्या माध्यमातून मुलींच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा होत आहेत सायकल मिळाल्यानंतर मुलींच्या चेहऱ्यावरील आनंदाला पारावर उरला नव्हता व तर मुलींच्या पालकांनी सायकली मिळाल्यानंतर मुलींना वेळेवर शाळेत येजा करता येईल आणि अधिकचा वेळ अभ्यासाला मिळेल शिक्षण पूर्ण होईल अशी आशा व्यक्त केली यावेळी कॅनरा रोबेको मॅच्युअल फंडचे रिजनल हेड मॅनेजर कुलदीप थोरगुले, मयूर परिचारक,लक्ष्मण शिरसाट



गणेशा दटराव सतीश मुळे सुभाष मस्के विक्रम शिरसाठ अमोल डोके अँड इंद्रजीत परिचारक ज्ञानेश्वर मोरे इब्राहिम मोहरी सुजित कुमार संग्रह गोड नवनाथ रानगड नारायण शिंगण संगीता पाटील रोटरी क्लबचे अध्यक्ष व सदस्य लाभार्थी विद्यार्थी पालक शिक्षक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अनुसया (लक्ष्मी) मोटे यांचे निधन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनीधी : वागदरी ता. तुळजापूर येथील सामाजिक कार्यकर्ते शंकर दत्तू मोठे यांच्या पत्नी कै.सौ.अनुसया (लक्ष्मी) शंकर मोटे यांचे दि. २७-०१-२०२५ रोजी अल्पशा आजाराने दुर्दैवी निधन झाले. मृत्यू समई त्यांचे वय ३९ होते.त्यांच्या पार्थिव देहावर दि.२८-०१-२०२५ सकाळी ठीक ११ वाजता वागदरी येथे अत्यंसस्कार करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पति, दोन मुले, एक मुलगी सासू सासरे, असा मोठा परिवार आहे.

**तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष तहसीलदार तर ग्राम समितीचे अध्यक्ष सरपंच असणार**

**अनेक समस्या, प्रश्नांवर निघणार तोडगा**

# ग्रामीण भागातील अतिक्रमित रस्त्याप्रश्नी निफाड तालुका व गावपातळीवर समितीची घोषणा : तहसीलदार विशाल नाईकवाडे



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शासन आदेशानुसार गांव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद रस्ते झालेले शिवरस्ते, गाडी, रस्ते, पाणंद, पांधण, शेतरस्ते, शिवाररस्ते, शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करणेबाबत निफाड महसूल विभाग गंभीर असून तात्काळ कार्यवाही साठी निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी निफाड तालुका व ग्रामपातळीवर समितीची घोषणा केली आहे.

ग्रामीण भागात रस्त्यांवरून मोठ्या प्रमाणावर वाद होत असून त्यामुळे एकमेकांविरुध्द महसूल प्रशासन, पोलीस विभाग तसेच न्यायालयाकडे दावे / फिर्यादी दाखल होऊन त्यातून वेळ व आर्थिक अपव्यय होऊन प्रसंगी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो. या सर्व बाबीचा परिणाम शेती उत्पादन व शेतीपूरक व्यवसायावर होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून गाव नकाशा प्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले शिवरस्ते, गाडी रस्ते, पाणंद, पांधण, शेतरस्ते, शिवाररस्ते, शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करुन जमिनीत जाणे येणेसाठी रस्ता उपलब्ध व्हावा यासाठी तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समिती गठित करणे व गठित समिती मार्फत रस्त्यांसंबधी उद्भवणारे वाद मिटवून सर्वाच्या सहकार्यातून विकास घडवून आणता येईल व शेतकरी सक्षम होण्यास मदत होईल. त्यासाठी तालुका स्तरीय व ग्राम स्तरीय समिती गठित करण्यात येत आहे.

तालुका स्तरीय समितीत :- तहसिलदार, निफाड (अध्यक्ष), गटविकास अधिकारी, निफाड (सह अध्यक्ष), उपअधिक्षक, भुमी अभिलेख निफाड, तालुका कृषि अधिकारी, निफाड, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग निफाड, पोलीस निरीक्षक, निफाड, पिंपळगाव ब., ओझर, सहा. पोलीस निरीक्षक, लासलगाव सायखेडा हे सदस्य तर उपविभागीय अभियंता, जि.प.सा.बां. विभाग निफाड हे सदस्य सचिव असणार आहेत. महाराष्ट्र शासनाचे महाराजस्व अभियानास व्यापक प्रसिध्दी देवुन ग्रामपंचायतीकडुन शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करणे या करिता प्रस्ताव प्राप्त करुन घेणे, ज्याठिकाणी रस्ते अतिक्रमीत झाले आहेत अशा ठिकाणी शेतकऱ्यांची बैठक घेणे व शेतकऱ्यांना समजावुन सांगणे, वरिल प्रमाणे प्रकरणे निकाली लागत नसल्यास अशा ठिकाणी नियमानुसार पोलीस यंत्रणेची मदत घेणे, आवश्यकता असल्यास गौण खनिज पट्ट्यातून दगड, मुरुम उपलब्ध करुन देणे, आवश्यकता असल्यास मोजणी कर्मचारी यांचेशी समन्वय साधणे अशी या तालुकास्तरीय समितीची कार्यकक्षा असणार आहे.

ग्रामपातळीवर रस्त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामस्तरीय समिती असणार असून सरपंच अध्यक्ष असतील. यासमितीत मंडळ अधिकारी (महसुल), तंटामुक्ती समिती अध्यक्ष, चेअरमन, वि.का. सेवा सह सोसायटी, प्रगतशिल शेतकरी, एक महिला ग्रा.पं.सदस्य, ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक), कृषि सहाय्यक, बिट जमादार, पोलीस पाटील हे सदस्य तर तलाठी सदस्य सचिव असतील. गावात निर्माण होणारे रस्त्याबाबतच्या वादाचे गाव पातळीवरच समुपदेशन करुन सामोपचाराने निराकरण करण्यात यावे. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांनी रस्ते अतिक्रमण केले आहे अशा ठिकाणी शेतकऱ्यांची बैठक घेणे व शेतकऱ्यांना समजावुन सांगणे, आवश्यकता असल्यास असे प्रकरण रस्ता समिती समोर ठेवणे, यानंतरही रस्त्याबाबतचा वाद न मिटल्यास असे प्रकरण संबंधितास मामलेदार कोर्ट अ‍ॅक्ट १९०६ अंतर्गत तहसिल कार्यालयात दाखल करणेबाबत सुचविण्यात यावेत. शेतकऱ्यांची मागणी नविन रस्त्याबाबतची असल्यास त्यांना महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये सोयीचा रस्ता मागणी प्रस्ताव तहसिल कार्यालयात दाखल करणेबाबत सुचविण्यात यावेत, अर्जदाराने अर्ज दिल्याप्रमाणे मागणी केलेल्या रस्त्यास आवश्यकता असल्यास पर्यायी रस्ता, रस्ता समितीने सुचवावे, आवश्यकतेनुसार समितीची बैठक घेणे व त्याबाबचे अभिलेख ठेवणे अशी ग्रामस्तरीय समितीची कार्यकक्षा असणार आहे.

**ग्रामसमितीने रस्त्या विषयीचे जास्तीत जास्त प्रश्न गाव पातळीवरच मिटवावेत, असे न झाल्यास तालुका स्तरीय समिती समोर वर्ग करणेत यावे. तालुका स्तरीय समितीने त्यांचे कार्यकक्षेप्रमाणे रस्त्याच्या प्रश्नांची सोडवणुक करावी. शेतकऱ्यांचा रस्त्याचा प्रश्न कायमस्वरुपी मिटण्यासाठी व्यवस्था करावी. तसेच सर्व संबंधितांनी सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी.**

**– मा.विशाल नाईकवाडे**
**मे.तहसिलदार, निफाड**